# प्रकरण सहावे

## सा रां श

# प्रकरण सहावे

## सा रां श

सोलापूर जिल्हा हा दुष्काळी भाग असून शेती ही बहुतांशी निसर्गावर अवलंबून असल्याने शेती करणाऱ्या व्यक्ती कमी प्रमाणात आढळतात. तर उत्तर सोलापूर तालुका सोलापूर शहरापासून जवळ असल्याने शहरात जाऊन नोकरी करणाऱ्या व्यक्तींची संख्या अधिक आढळते. त्याप्रमाणात शेती व्यापार करणाऱ्या व्यक्ती कमी प्रमाणात आढळतात.

वयानुसार व्यक्ती संख्येचा भाग पाहिल्यास मध्यम वयोगट ३५ ते ४४ वर्षे संख्या जास्त तर ६० वर्षावरील व्यक्ती सर्वात कमी प्रमाणात आढळून आल्या.

धर्माच्या बाबतीत ग्रामीण भागात सर्वात जास्त हिंदू त्यानंतर मुस्लीम व बौध्द धर्माचे लोक आढळून आले. इतर धर्म आढळले नाहीत.

सर्वेक्षणातील सहा गांवातून माध्यमिक शाळा आहेत, तर प्राथमिक शिक्षण हे शासनाने सर्वत्र विनामूल्य व सक्तीचे केल्याने १० वी पर्यंत शिक्षण घेतलेल्या व्यक्तींचे प्रमाण सर्वात जास्त आढळते. त्याचबरोबर शहर जवळ असल्याने पदवीपर्यंतच्या शिक्षण सुविधा मिळाल्याने पदवीधरांची संख्या त्या खोलोखाल असल्याचे आढळून येते.

ग्रामीण भागात जागा, शेती, यामुळे एकत्र कुटुंब पध्दतीचे प्रमाण जास्त आढळले. तर शहर जवळ असल्याने मात्र शहरात नोकरी करणा-या व्यक्ती त्याचबरोबर नोकरीतील बदली यामुळें विभक्त कुटुंब पध्दती कमी प्रमाणात आढळली.

या भागात हिंदूची संख्या अधिक आणि कुटुंबनियोजन हिंदूना करण्याची सक्ती त्यामुळे एकत्र कुटुंब पध्दतीचे प्रमाण जरी जास्त असले तरी देखील व्यक्ती संख्या मात्र ५ ते ६ असलेली अनेक कुटुंबे आढळतात. तर मुस्लीम समाज प्रामुख्याने कुटुंब नियोजनाला जुमानत नाही व बहुतांश या समाजाच्या घरात व्यक्ती संख्या १० च्या वर आढळली.

शहराजवळ तालुका असल्याने येथे राहणा-या व्यक्ती नोकरी करणा-या अधिक त्यामुळे रु. २,०००/- च्या वर उत्पन्न असणा-याची संख्या सर्वाधिक तर शेतमजूर व छोटे शेतकरी यांचे उत्पन्न तसे मर्यादित असल्याचे आढळते.

स्वत:च्या शेतातील झाडाचे लाकूड, विहिरीचा दगड, राहण्यास मुबलक जागा यामुळे स्वत:च्या जागेत दगडमातीच्या धाब्याच्या घराचे प्रमाण सर्वात जास्त जास्त आढळून येते.

गावात सार्वजनिक वाचनालय वा ग्रामपंचायत ऑफिसमध्ये वर्तमानपत्रे आणली जात असल्याने ते वाचणा-यांची संख्या जास्त आढळते. तर अशिक्षितपणामुळें कांही व्यक्ती वर्तमानपत्रे वाचू शकत नाहीत.

ग्रामपंचायत तसेच गटाचे वर्चस्व दर्शविण्यासाठी वय वर्षे १८ पूर्ण झालेल्या स्त्री, पुरुष यांना मतदार म्हणून नोंदविले जाते. त्याचबरोबर मतदान करण्याच्या प्रक्रियेत ही तेथील व्यक्ती १०० % सहभागी असतात. त्याचबरोबर उत्तर सोलापूर हा तालुका राजकारणात अग्रेसर त्याला वर्तमानपत्रे, दूरदर्शन, रेडीओ यासारख्या माध्यमांची साथ असल्याने राजकीय पक्षाची माहिती असणाऱ्यांची संख्या जास्त आढळते.

उत्तर सोलापूर तालुक्याने महाराष्ट्र त्याचबरोबर देशाच्या राजकारणाच्या दृष्टीने बरीच मजल मारलेली असून या तालुक्यास कॉंग्रेसचा बालेकिल्ला म्हणून संबोधतात. कॉंग्रेस खालोखाल शिवसेना, भारतीय जनता पक्ष इ. पक्षाची माहिती असणाऱ्या व्यक्ती आढळतात. तर कांही शिक्षक, पोष्टमन इ. सरकारी नोकरांनी पक्षाची माहिती असून देखील, माहिती नाही असे सांगितले.

सरपंचाच्या कामाबाबत तसेच ग्रामपंचायतीच्या कामाबाबत स्थानिक गटाचे राजकारण व्यक्तीनिष्ठा या माध्यमातून समाधानकारक कार्य असे जास्त व्यक्तींनी सांगितले तर विरोधी गट असमाधानकारक कार्य असे सांगणारे कमी लोक आढळले.

प्रत्येक गांवासाठी स्वतंत्र पोलीस पाटील असलेले आढळले. तर तलाठी मात्र दोन ते तीन ग्रामपंतींना मिळून एक आढळला. गटविकास अधिकाऱ्याच्या योजना त्यास गावकऱ्याचा प्रतिसाद व योजना लाभ याचे प्रमाण चांगले आढळून आले.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

कांही गांवातून स्थानिक गटबाजीमुळे तात्पुरत्या स्वरूपाची पोलीस चौकी असल्याचे आढळले.

गांवच्या लोकांच्या पिण्याच्या पाण्याची सोय शासन सहकार्याने या तालुक्यात १००% झालेली आढळते. त्याचबरोबर प्राथमिक शिक्षण सोय १००% आढळली. मात्र सार्वजनिक स्वच्छतेची सोय ग्रामपंचायतीमार्फत कांही ठिकाणी होत नाही. अर्थात ग्रामीण भागात स्वत:च्या शेती-साठी खताकरिता उकिरडे तयार करण्याचे माध्यम ब-याच गांवातून आढळले.

गांव तेथे विज असा शासनाचा फतवा या तालुक्यात ख-या अर्थाने १००% पूर्ण झाला आहे. व त्याची देखभाल ग्रामपंचायती करत असल्याचे आढळून आले.

महाराष्ट्रात ग्रामपंचायती केंव्हा सुरु झाल्या त्याचा कायदा, एवढेच काय पण स्वत:च्या गांवात ग्रामपंचायत केंव्हा सुरु झाली हे ब-याच व्यक्तीना माहित नाही. कांही ठराविक व्यक्तींना थोडी बहुत माहिती असल्याचे आढळले तर कायदा सांगता आला नाही आणि गांवातील कांही वयस्कर व्यक्तींना मात्र आपल्या गावातील ग्रामपंचायतीची स्थापना वर्ष माहिती असल्याचे आढळून आले. मात्र कांही जुने राजकारणी व्यक्ती उदा. ज्यांच्याकडे पाटीलकी, देशमुखी वर्षानुवर्षे चालत आलेली आहे अशा व्यक्तींना तारीख महिन्यासह एवढेच काय पहिले सरपंच कोण होते यासह ग्रामपंचायतीचा तपशील स्वरूप माहिती असल्याचे आढळून आले आहे.

.....

# "सोलापूर जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या अभ्यासाची भूमिका

## उत्तर सोलापूर तालुक्याचा संदर्भ"

### प्रश्नावली

(अ) वैयक्तिक व कौटुंबिक माहिती -

१. संपूर्ण नांव -

२) हुद्दा -

३. वय ४) वय -

४. लिंग - पुरुष / स्त्री

५. धर्म

६. जात

७. शैक्षणिक पात्रता "

८. लिहिता येणाऱ्या भाषा -

९. वाचता येणाऱ्या भाषा -

१०. कुटुंबात - एकत्र / विभक्त

११. कुटुंबातील व्यक्ती संख्या (स्वत:सह) -

१२. व्यवसाय -

१३) मासिक उत्पन्न रु.

१४. अन्य स्थावर मालमत्तेपासून उत्पन्न रु.

१५. कुटुंबाचा एकूण मासिक खर्च रु.

१६. राहण्याची जागा - स्वत:ची/भाड्याची/सरकारी.

१७) घराचे स्वरूप - झोपडी/धाब्याचे/कॉंक्रीट

( ब) ग्रामपंचायतीची माहिती -

१८. गांवाचे नांव - तालुका उत्तर सोलापूर

जि. सोलापूर, राज्य - महाराष्ट्र

१९. आपण वर्तमानपत्रे वाचता काय ? होय / नाही.

वाचत असल्यास कोणती ?

२०. आपण मतदार आहात काय ? होय / नाही.

२१. आपल्या घरातील व्यक्ती मतदानाला जातात काय ? होय/नाही.

२२. आपणाला राजकीय पक्ष माहित आहेत काय ? होय/नाही.

माहित असल्यास कोणते ?

२३. आपण राजकीय पक्षाचे सभासद आहात काय ? होय/नाही.

असल्यास कोणत्या राजकीय पक्षाचे -

२४. आपला आवडता राजकीय पक्ष कोणता आहे ?

२५. आपणास राजकीय नेत्यांची नांवे माहित आहेत काय ? होय/नाही

२६. माहित असल्यास त्यांची नांवे -

२६. आपला आवडता राजकीय नेता कोण आहे ?

२७. आपल्या गावांत ग्रामपंचायत कुठल्या स्वरूपाची आहे ?

२८. आपल्या गांवात ग्रामपंचायतीच्या निवडणुका किती वर्षांनी होतात ? तीन/पांच/सात

२९. आपल्या गांवातील ग्रामपंचायतीमधील पंच संख्या किती आहे ?

त्यांचे काम समाधानकारक आहे काय ?

३०. आपल्या गांवाचे सरपंच कोण आहेत ?

त्यांचे काम समाधानकारक आहे का ?

३१. आपल्या गांवासाठी स्वतंत्र पोलीस पाटील आहेत काय ?होय/नाही.

३२. आपल्या गांवासाठी तलाठी आहे काय ? होय/नाही

त्यांचे काम समाधानकारक आहे काय ?

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

३३) आपल्या गांवात गटविकास अधिकारी येतात काय ? होय/नाही

३४. गटविकास अधिकारी आपल्या समोर नवीन योजना होय/नाही
मांडतात काय ? असल्यास योजना यशस्वी केल्या जातात काय ?

३५. गांवकरी नवीन योजनेत सहभागी होतात काय ? होय/नाही
असल्यास त्यांचे सहभागाचे प्रमाण - पूर्ण सहभाग/
अल्प प्रमाणात सहभाग/सहभाग नाही.

३६. आपल्या गांवात पोलीस चौकी आहे काय ? होय/नाही
असल्यास पोलीस व त्यांचे अधिकारी यांचे काम
समाधानकारक आहे काय ?

३७. आपल्या गांवात प्राथमिक शाळा आहे काय ? होय/नाही

३८. आपल्या गांवात माध्यमिक शाळा आहे काय ? होय/नाही

३९. आपल्या घरात राजकीय नेत्यांचे फोटो आहेत काय ? होय/नाही

४०. असल्यास कोणात्या नेत्यांचे आहेत ?

४०. आपल्या गांवात बाजार भरतो का ? होय/नाही
भरत असल्यास केंव्हा भरतो ?

४१. यांतून ग्रामपंचायतीला उत्पन्न मिळते काय ? होय/नाही

४२. ग्रामपंचायत विकास योजना राबविते काय ? होय/नाही
असल्यास कोणात्या ?

४३. सदर योजनेचा लाभ गावकऱ्यांना मिळतो काय ? होय/नाही
होत असल्यास त्याचे प्रमाणे अ) जास्त प्रमाणात
ब) मध्यम प्रमाणात
क) कमी प्रमाणात

४४. गांवात पाण्याची सोय आहे काय ? विहीर/नळपाणी/आड
असल्यास कोणात्या प्रकारची ?

४५. गांवातील सांडपाणी, संडास, घाण याचा निचरा होय/नाही
केला जातो काय ?

४६. आपल्या गांवात विजेची सोय आहे काय ? होय/नाही

४७. आपल्या गांवात चौकांत दिवाबत्ती लावली आहेत काय ? होय/नाही

४८. असल्यास सदर सोय कोण करते ?

४८. आपणास ग्रामपंचायतीचा कायदा माहित आहे काय ? होय/नाही

४९. ग्रामपंचायत कायदा महाराष्ट्रात केव्हा सुरु झाला ? माहित आहे/
~~असल्यास सद~~ माहित असल्यास केंव्हा ? नाही.

५०. आपल्या गांवात ग्रामपंचायतीची स्थापना केंव्हा झाली माहित आहे/
हे माहित असल्यास केंव्हा ? नाही.

५१. आपल्या गांवाच्या विकासासाठी कोणत्या योजना -
ग्रामपंचायतीने राबवाव्यात असे आपणास वाटते ?

५२. ग्रामपंचायतीच्या वतीने एखादे कार्य जनकल्याणासाठी होय/नाही
केले जाते काय ?
असल्यास त्याचे स्वरुप -

५३. ग्रामपंचायत एखादे जनीनिधीतून कार्य करते काय ? होय/नाही
असल्यास कोणते ?

५४. ग्रामपंचायतीबाबत आपले मत -

५५. याशिवाय आपणांस आणखी इतर कांही
माहिती द्यावयाची आहे काय ?

असल्यास कोणती ?

---

मुलाखत देणा-याची सही

....

## संदर्भग्रंथ सूची


१) मराठी विश्वकोश - खंड ५

२) भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था उद्गम आणि विकास

- श्री बढे जी. एस.
- हिमालय पब्लीसींग हाऊस, मुंबई
- प्रथमावृत्ती - १९७८.

३) पंचायत राज्य - डा. द. गो. कापशीकर
भाग- १ दत्त प्रकाशन, नाशिक
प्रथमावृत्ती - १२/३/१९६३.
भाग - २, प्रथमावृत्ती- १५/८/१९६३.

४) पंचायत राज्य - प्रा.डा. सुरेश काकडे आणि
प्रा. अरविंद वझे, प्राची प्रकाशन
मुंबई, प्रथमावृत्ती- २१/६/१९८३.

५) मुंबई ग्रामपंचायत कायदा - १९५८ कायदा, १९५९ मधील नं. ३

- महाराष्ट्र शासन
- आवृत्ती - ४,/६/१९९० पर्यंत सुधारित

६) मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम १९५९-

- महाराष्ट्र शासन, आवृत्ती- ५/११/९२ पर्यंत.

७) सभाशास्त्र अर्थात सभांचा कायदा व कार्यपध्दती -

- अड. शंकरराव जोशी
चौथी आवृत्ती १९७२, न्यायदीप प्रकाशन.


SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

८) सोलापूर गाईड - श्री विनायक उदगिरी

९) सोलापूर जिल्हा दर्शन - श्री हरीभाऊ शितोळे

१०) सोलापूर जिल्हा गॅझेटीयर - महाराष्ट्र शासन, १९९० ची आवृत्ती

११) सामान्य भूगोल - महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, पुणे. आपला सोलापूर जिल्हा इयत्ता ३ री.

१२) दैनिक - संचार, तरुण भारत, केसरी, सोलापूर

१३) पंचायतराज आणि नागरी प्रकाशन -

- डॉ. अर्जुनराव दर्शनकार, कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९९२.

१४) पर्यटन मार्गदर्शिका - समर्थ उद्योग महाराष्ट्र, समर्थ उद्योग प्रकाशन.